# अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

**रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया मान्यताप्राप्त NBFC MFI**






## तेरावा वार्षिक अहवाल

# 2021-2022


www.anikfin.com | anikfin@gmail.com | (02382)227782

# आमची वैशिष्टये

**१८००**
एकूण Active ग्राहक

**२८.५० कोटी**
एकूण कर्ज पोर्टफोलिओ

**२**
राज्यात कार्यरत

**७**
एकूण शाखांची संख्या

**५८**
एकूण कर्मचारी संख्या

- गेली १० वर्षे ९९% कर्ज वसुलीचे ट्रॅक रेकॉर्ड
- नाविन्यपूर्ण त्रिस्तरीय संरचना
- समाजातील दुर्लक्षित घटकांकरीता कार्य
- ANIK
- महिलांच्या सहभागातून महिलांचे आर्थिक सक्षत्तीकरण
- १००% कर्ज पाठपुरावा महिलांव्दारे
- १००% पतपुरवठा केवळ महिलांसाठी

माहिती संकलन – संपूर्ण अनिक टिम

अंकमांडणी व डिझाईन - उमेश टोणपे
मुद्रण - Imperial Printers And Laminators

# अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड

## तेरावा वार्षिक अहवाल २०२१-२०२२

### विद्यमान संचालक मंडळ



**श्री रमेश भिसे**
चेअरमन



**श्री जयाजी पाईकराव**
व्हाईस चेअरमन



**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर**
व्यवस्थापकिय संचालक



**श्री. हेमंतकुमार वाळवेकर**
संचालक



**श्री. विक्रमजित मेहमी**
संचालक



**श्रीमती सीमंतिनी खोत**
संचालक



**श्री. सुभाष तगारे**
चेअरमन



**श्री.ऋषीकेश विश्वनाथ तोडकर**
संचालक



**श्री. विजय रमेश भिसे**
संचालक



**श्री सुरज बालासाहेब सूर्यवंशी**
संचालक

# व्यवस्थापकिय समिती



**श्री रमेश भिसे**
**अध्यक्ष**



**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर**
**व्यवस्थापकिय संचालक**



**श्री.बालासाहेब सूर्यवंशी**
**उपाध्यक्ष**



**श्री. यशवंत आहेर** CEO
सदस्य



**श्री. विलास गोडगे**
ऑपरेशन हेड (उस्मानाबाद युनिट)

## अनिक वरिष्ठ प्रबंधन अधिकारी (मुख्यकार्यालय)

**श्रीमती.तेजश्री भालेराव** (अकाउंट एक्झिक्यूटिव्ह,मुख्यकार्यालय)
**श्री. उमेश टोणपे** (सॉफ्टवेअर प्रभारी)

## अनिक वरिष्ठ प्रबंधन अधिकारी (शाखाव्यवस्थापन)

**श्री. शरद पवार**, (शाखाधिकारी, केज बीड)
**श्री. भिकाजी जाधव**, (शाखाधिकारी कळंब उस्मानाबाद)
**श्री. बालाजी शेंडगे**, (शाखाधिकारी, वाशी उस्मानाबाद)
**श्री. अतुल चिलवंत**, (शाखाधिकारी, भुम उस्मानाबाद)
**श्री. सुशांत पाईकराव**, (शाखाधिकारी, हिंगोली)
**श्री. श्रीरंग वाळवेकर**, (शाखाधिकारी, प्रस्तावित-विकाराबाद, तेलंगणाराज्य शाखा)

## लेखापरिक्षक

**Yadkikar & Chandak**
Chartered Accountant
(ICAI Firm Registration No 129599 W
Aurangabad)

## बॅंकर्स

National Scheduled Caste Finance & Development Corporation **(NSFDC)** Delhi

RBL BANK

State Bank of India
THE BANKER TO EVERY INDIAN



# मनोगत

**श्री रमेश भिसे,** (चेअरमन)

अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचा तेरावा अंक आपणास सुपूर्द करताना आम्हाला अत्यंत आनंद होत आहे. मराठवाड्यातील ग्रामीण भागातील गरीब व दुर्लक्षित कुटुंबांना विकासाचा केंद्रबिंदू मानून त्यांचे आर्थिक सामाजिक व शैक्षणिक चिरंतन विकासासाठी अनिकच्या माध्यमातून कर्जरूपी त्यांना अर्थसहाय्य करून हजारो गरीब कुटुंबाचे शेतीशी निगडित छोटे मोठे स्वयम् रोजगार उभे करून देण्यामध्ये अनिक यशस्वी झालेली आहे गेल्या १३ वर्षांपूर्वी अनिकच एक छोटंसं रोपट ग्रामीण भागामध्ये गरिबांच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र येऊन लावलं होतं. त्याचा आज ग्रामीण भागातील गरीब लोकांनी वटवृक्ष उभा केलेला आहे.

**मराठवाड्यातील बीड, लातूर, हिंगोली, उस्मानाबाद अश्या जिल्ह्यांतील तीनशे गावातील २५००० गरीब कुटुंबासोबत बचत गटाच्या माध्यमातून गरजू, गरीब लोकांना अर्थसहाय्य पुरवून त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात जोडलेले आहे.**

कोरोना सारख्या महामारीच्या काळामध्ये सुद्धा अनिकच्या माध्यमातून झालेला कर्ज पुरवठा , कर्जदार सभासदांनी शंभर टक्के परतफेड केला ही खरच गौरवाची आणि कौतुकाची बाब आहे, अनिकचा झालेला फायदा कोरोना काळात लोकांना मदतीसाठीच उपयोगी आला.

अनिक मध्ये गुंतवलेल्या गुंतवणूकदाराची गुंतवणूक एक दिवस ही मागेपुढे न करता आम्ही वेळेत त्यांच्या लाभांशासह परत केली. तसेच गुंतवणूकदारा दर तिमाही स्वरूपात त्यांनी गुंतवलेल्या रक्कमेवर व्याज कुठलाही विलंब न करता अनिक सातत्याने देत आहे.

अनिक सोबत काम करणारी फिल्ड व ऑफिस टीम यांनी अतिशय परिश्रम व मेहनत घेऊन प्रामाणिकपणे आनिकच्या माध्यमातून गोरगरिबापर्यंत वेळेत अर्थसहाय्य कर्जपुरवठा करून गोरगरीब लोकांना मदत केली अनिक ही फक्त फायनान्सच करत नाही तर त्यासोबत समाजकार्य ही करते . त्यामुळे कर्जदाराला व लाभधारकाला ही कंपनी आपली आहे असं वाटते हीच खरी आमच्या कामाची पावती आहे **भविष्यात अनिकच्या माध्यमातून जास्तीत जास्त गोरगरिबापर्यंत कर्जपुरवठा व्हावा व त्यांनी तो १००% वेळेत परतफेड करावा हीच अपेक्षा**

अनिकमध्ये गुंतवणूक केलेल्या सर्व गुंतवणूकदारांचे मी आभार मानतो. आपल्या गुंतवणुकीमुळेच आम्ही जास्तीत जास्त गोरगरिबांना मदत करू शकलो, भविष्यात ही असेच आपल्या सहकार्याच्या व मार्गदर्शनाच्या अपेक्षेत.

**आपला सहकारी**

**रमेश भिसे**
चेअरमन



# मनोगत

**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर** (व्यवस्थापकिय संचालक)

अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संपन्न होत आहे. वार्षिक सभेच्या निमित्ताने अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेटचा तेरावा वार्षिक अहवाल प्रसिद्ध करताना आम्हाला मनस्वी आनंद होतो आहे. या वार्षिक अंकाच्या मार्फत कंपनीची प्रगती आणि कंपनीच्या एकूण यशाची वाटचाल आपणासमोर व्यक्त करण्यास अत्यंत समाधान होत आहे.

समाजातील तळागाळातील उपेक्षित, दलित, अल्पभूधारक, कष्टकरी, कामकरी, शेतमजूर कुटुंबाचा आर्थिक विकास झाला पाहिजे, या सर्व घटकांकरीता उद्योग व्यवसाय निर्माण होऊन रोजगारांच्या संधी निर्माण झाल्या पाहिजेत. रोजगाराच्या संधी निर्माण करत असताना त्या कुटुंबातील प्रत्येक महिलेला उद्योग, व्यवसाय, रोजगार यामध्ये प्रथम स्थान मिळाले पाहिजे. आणि कुटुंबातील एकूण कारभारामध्ये विशेषता आर्थिक कारभारामध्ये महिलांना प्राधान्य मिळाले पाहिजे या भूमिकेतून अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड आर्थिक विकासाचे कार्य करत आहे. म्हणूनच अनिकने महिलांना प्राधान्य देऊन महिलांच्या मार्फतच संपूर्ण कार्यकारभार आणि आर्थिक देवाणघेवाणीमध्ये महिलांना प्राधान्य दिलेले आहे.

**यामुळे अनेक वेगवेगळे झालेले फायदे समोर आले त्यामध्ये प्रामुख्याने**

- महिलांची आर्थिक साक्षरता विकसित झाली
- रोजगाराचा आणि उद्योग व्यवसायाचा महिलांचा दृष्टिकोन विकसित झाला
- आर्थिक व्यावसायिक हिशोब ठेवण्यामध्ये महिला पारंगत झाल्या
- कुटुंबाच्या आर्थिक विकासामध्ये महिलांच्या सहभागामुळे कुटुंबातील त्यांचे स्थान उंचावले
- महिलांच्या या योगदानामुळे मुलांचं शिक्षण चांगल्या प्रकारे करता आलं
- कुटुंबाच्या आर्थिक प्रगती बरोबरच कुटुंबातील स्थावर मालमत्ता जमीन घर अशा पद्धतीची संसाधने विकसित झाली.

## ठळक नोंदी

- मार्च २०२१ अखेर कंपनीचे आऊटस्टँडिंग होते रू १८ कोटी ६८ लाख
- मार्च २०२२ अखेर झालेले आहे २२ कोटी ९७ लाख
- गुतवणूंकीमध्ये मोठी वाढ होत आहे.
- कंपनीवर गुंतवणूकदारांचा विश्वास वाढला आहे .
- रिकव्हरीचे प्रमाणे **९९.५८ टक्के** आहे.
- एन पी ए मध्ये घटझालेली आहे.
- वेगवेगळ्या सामाजीक उपक्रमातुन देखील कंपनीने आपला वेगळा ठसा जनमानसात उमठवला आहे.
- **तेलंगणा राज्यात देखील आता कंपनीची शाखा विस्तार**

अशा प्रकारचे विविध फायदे अनिक बरोबर जोडल्या गेलेल्या प्रत्येक कुटुंबाला झालेले आहेत आणि अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड मुळे उपेक्षित दलित आणि गरीब कुटुंबांचा आर्थिक विकास होतो आहे याचे मनस्वी समाधान आहे. दरवर्षी अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचा आपल्या कामाचा आणि एकूण प्रगतीचा आलेख अधिक प्रगल्भ आणि विकसित होतो आहे.
**त्यातील महत्त्वाचे काही ठळक मुद्दे खालील प्रमाणे आहे**

अत्यंत महत्वाचे म्हणजे भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या मार्गदर्शक तत्त्व प्रणालीप्रमाणे कंपनीचे कामकाज चालू आहे. **भारतीय रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या प्रत्येक नियमांचा आणि मार्गदर्शक तत्त्वांचा कंपनी आपल्या कामांमध्ये काटेकोरपणे अवलंब करते. कंपनी कायद्यानुसार रजिस्टर ऑफ कंपनीजच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वाला अवलंबून कंपनी आपला कार्यकारभार करत आहे. तसेच इन्कम टॅक्स डिपार्टमेंटच्या सर्व मार्गदर्शक तत्त्वांचेही कंपनी तंतोतंत पालन करते आहे**. एकूणच शासनाच्या कंपनीशी संबंधित सर्व विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांच्या व नियमांच्या तसेच अटींच्या आधीन राहून कंपनी आपलं कामकाज करत आहे.

भविष्यात अधिकाधिक लोकहिताची आणि समाजाच्या उपयोगाचं काम कंपनीच्या हातून करण्याच्या साठी गरिबांच्या आर्थिक विकासासाठी आम्ही कटिबद्ध राहू अशी या वार्षिक अहवालाच्या निमित्ताने आपणास आम्ही खात्री देत आहोत.आणि या वार्षिक तेराव्या सर्वसाधारण सभेच्या निमित्ताने प्रसिद्ध केलेल्या वार्षिक अंकातून आपणास हार्दिक हार्दिक शुभेच्छा देत आहोत..

**श्री. विश्वनाथअण्णा तोडकर** (व्यवस्थापकीय संचालक)



# मनोगत

## श्री. जयाजी पाईकराव (व्हाईस चेअरमन)

सप्रेम नमस्कार ......

अनिक फायनान्सियल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचा १३ वा वार्षिक अहवाल प्रसिद्ध होत असल्याचा मनस्वी आनंद होत आहे. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी कंपनीच्या माध्यमातून सुक्ष्म पत पुरवठा करून उपजिवीका निर्माण व उभारणी केलेली आहे.

कंपनीने कोविड-१९ च्या परिस्थितावर संपूर्ण मात केलेली आहे, व फिल्डलेवरची कामे पुर्ववत झालेली आहे, व महिलांना स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्यात अनिक अग्रेसर आहे. यातून सर्व युनिटची गरज खरच लक्षात आली व या माध्यमातून निर्माण झालेली उपजिवीका गरजू कुटुंबाना आर्थिक सक्षम करण्यासाठी मदतगार ठरली. महिला नेतृत्व क्षमता विकसित करण्यासाठी हे वर्ष यशस्वी ठरले आहे. **त्याच बरोबर महिलांना आर्थिक साक्षरता शिकवून आत्मनिर्भर करण्यासाठी योग्य ती आखणी करण्यात आलेली आहे.**



# मनोगत

## श्री. सुभाष तगारे (संचालक)

**सप्रेम नमस्कार**

आपल्या कंपनीचा **<u>१३ वा वार्षिक अहवाल</u>** आपल्यापुढे मांडतांना अतिशय आनंद होत आहे. कंपनीने गेल्या आर्थिक वर्षात ३.९६कोटी एन.सी.डी मध्ये उभे केले आहे हे केवळ आणि केवळ कंपनीवर विश्वास ठेवणा–या गुंतवणूकदारांमुळेच...

**सर्व गुंतवणूकदारांचे मनापासून आभार...!**

तसेच एन.एस.एफ.डी.सी कडुन रू २९८.९८ लाख मंजूर केलेले आहे. एकीकडे कर्जमाफीचे अमिष दाखवून सामान्य माणसाला लाचार बनवून, दारिद्रयातच ठेवणारे शासन तर दुसरीकडे आपल्या प्रत्येक रूपयाचा योग्य विनियोग करून आपली आर्थिक परिस्थिती सुधारावी व कर्जाची परतफेड करून स्वाभिमानाने सन्मानाने जगावे असे सांगणारी आपली कंपनी.

आपल्या कार्यक्षेत्रातील ग्राहकांनी गेल्या वर्षी कर्ज परतफेड **९९.५८ टक्के** केली ही फार विशेष बाब आहे, यामध्ये कंपनीच्या सर्व कर्मचारी वर्गाचे मोलाचे योगदान आहे. त्यांचे मनापासून अभिनंदन.. **SMERA या Rating ने आपल्याला M-4 असे रेटींग दिले आहे ही फार आनंदाची बाब आहे.**

**कंपनीच्या यशस्वी वाटचालीसाठी सर्व गुंतवणुकदार, अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्यकार्यकारी अधिकारी, बॅक ऑफीस कर्मचारी वृंद, शाखा व्यवस्थापक, एफ एक्स, क्लस्टर असिस्टंट प्रत्यक्ष, अप्रत्यक्ष कार्यरत असणारी मंडळी सर्वांचे पुन्हा एकदा मनापासून अभिनंदन व आभार !**



# मनोगत

**श्री बालासाहेब सूर्यवंशी,** (उपाध्यक्ष व्यवस्थापकिय समिती)

सप्रेम नमस्कार,

अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचा **तेरावा वार्षिक अहवाल** प्रकाशित होत आहे, निश्चितच आपणा सर्वास मनस्वी आनंद होत आहे. आपण वेगाने प्रगती करणा-या जागतिक वातावरणात जीवन जगत आहोत. आपला भारत देश महासत्ता बनवण्याच्या स्वप्ना बरोबरच आता आत्मनिर्भर बनण्याचे स्वप्न पाहत आहे. या स्पर्धेमध्ये ग्रामीण भाग मात्र सरपटत मागे येत आहे.

बेरोजगारी, रोजगारासाठी स्थलांतर महिला वर्गाला प्रत्येक क्षेत्रात मिळणारी दुय्यम वागणूक तसेच ग्रामीण भागातील वाढते दारिद्रय आणि आर्थिक उन्नती साधण्यासाठी पायाभूत साधनांचा असलेला अभाव सोबतच राजकीय मजबूत व दूरदृष्टी नेतृत्वाचा अभाव इत्यादी समस्या समोर असताना आत्मनिर्भर बनन्याचे स्वप्न साकार कसे होणार?

अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड ग्रामीण भागातील आर्थिक स्थिती बदलण्यासाठी महत्त्वाची भूमिका पार पाडत आहे. ग्रामीण विकास प्रक्रियेचा अगदी पायाभूत अनुभव असणा-या नेतृत्वाच्या पुढाकारातून अनिक फायनान्शियल सर्व्हिसेस वरचेवर प्रगती करत आहे. यामुळे ख-या अर्थाने ग्रामीण भागातील महिला मार्फत विकासाची प्रक्रिया मजबूत होण्यास मदत होणार आहे. येणा-या कालावधीमध्ये सुद्धा अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस अगदी यशस्वीतेच्या शिखरावर गेल्याशिवाय राहणार नाही यावर माझा पूर्ण विश्वास आहे. विशेषतः यामध्ये सामान्य महिला भागीदार बनत आहे फक्त व्यवसायासाठी कर्ज घेणेच नाही तर गुंतवणुकीची प्रक्रिया ही होत आहे.

या प्रक्रियेचा मजबूत पाया ग्रामीण भागातील महिला शक्ती आहे. निश्चितच ग्रामीण विकासाचे आर्थिक आदर्श मॉडेल निर्माण होण्याची शक्ती या प्रक्रियेमध्ये आहे. हे स्तुत्य कार्य करण्यासाठी माझ्यासारख्या एका कार्यकत्याचा खारीचा वाटा त्यामध्ये निश्चितच आहे.नक्कीच यापुढे आणखी ताकतीने संघशक्ती च्या जोरावर ही विकास प्रक्रिया मजबूत करण्याचा प्रयत्न करू, **यामध्ये प्रक्रियेत सहभागी झालेल्या व होत असलेल्या सर्व टीमचे मनापासून अभिनंदन...**

**श्री बालासाहेब सूर्यवंशी**
(उपाध्यक्ष,व्यवस्थापकिय समिती)

# तेरावी वार्षिक सर्वसाधारण सभा सन - २०२१- २०२२

स्थळ – रजिस्टर्ड ऑफिस, लातुर

दिनांक २७ सप्टेंबर २०२२

## संचालक मंडळाचा अहवाल सन २०२१-२०२२

**सन्माननीय संचालक व सदस्य,**

**दिनांक ३१ मार्च २०२२** रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाचा लेखा परिक्षकांनी तपासलेला ताळेबंद व नफा व तोटा पत्रक संचालक मंडळाच्या तेराव्या वार्षिक अहवालासोबत आपल्यासमोर सादर करतांना आनंद होत आहे.

प्रगती चित्र (आकडेवारी कोटींमध्ये)

| तपशील | वर्ष अखेर ३१ मार्च २०२१ | वर्ष अखेर ३१ मार्च २०२२ |
|---|---|---|
| कर्जे (निव्वळ) | १८.६८ | २२.९६ |
| ढोबळ नफा | ०.१४ | ०.१६ |
| निव्वळ नफा | ०.१० | ०.११ |




मागील ५ वर्षांतील निव्वळ कर्ज स्थिती (आकडेवारी कोटींमध्ये)




मागील ५ वर्षांतील निव्वळ नफा चित्र (रक्कम लाखांमध्ये)

## नफा विनियोग

चालू वर्षाच्या नफ्याचा विनियोग खालीलप्रमाणे आहे.

(आकडेवारी लाखात)

| विनियोग | रक्कम रु |
|---|---|
| वैधानिक निधी | २.३७ |
| शिल्लक नफा | ९.५० |

हया वर्षी कंपनीला निव्वळ नफा ११ लाख ८७ हजार झाला आहे, कंपनीच्या भांडवल वाढीचा उददेश समोर ठेवून संचालक मंडळाने आर्थिक वर्ष २०२१-२०२२ वर्षाकरीता Equity वर लाभांश न देण्याचा निर्णय घेतला आहे.

## भांडवल पर्याप्तता प्रमाण

कंपनीचे स्वतःचे भांडवल वाढलेले असले तरी NSFDC चे रू ४२३.०० लाख व इतर कर्ज आणि अँडव्हान्सेस (NCD) रू ८३८.९९ लाख असल्या कारणाने भांडवल पर्याप्तता प्रमाणामध्ये थोडीशी वाढ झाल्यामुळे **भांडवल पर्याप्तता प्रमाण गतवर्षीच्या २८.१५ % पेक्षा या आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये २८.५५% झालेले आहे.**

## कंपनीचे भांडवल व स्वनिधी

**दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी कंपनीच्या एकूण भांडवल व स्वनिधी स्थिती खालीलप्रमाणे**

| तपशील | रक्कम लाखात |
|---|---|
| चुकते केलेले भांडवल | ९७९.६६ |
| राखीव व शिल्लक भांडवल | २२२.२१ |
| शेअर अँप्लिकेशन मनी | ०.० |
| एकूण भांडवल | १२०१.८७ |
| उणे स्टेच्युटरी रिझर्व्ह | १४.०४ |
| स्वनिधी | ११८७.८३ |

**गेल्या आर्थिक वर्षात कंपनीचे स्वतःचे भाग भांडवल रू ९.५१ लाखाने वाढले आहे.**

## कर्जे

**गत आर्थिक वर्षात २०२१-२०२२** मध्ये कंपनीने एकूण **५०९४ गटांना** रु **२०.२८ कोटींचे कर्ज वाटप केले**. रिझर्व्ह बँकेच्या नवीन मार्गदर्शक सुचनेची पुर्तता कंपनीने तंतोतंत आंमलात आणली आहे, **रिझर्व्ह बँकेची मार्गदर्शक तत्वे लक्षात ठेवुनच गटांना कर्ज वाटप करण्यात आलेले आहे.**

**युनिट निहाय (३१ मार्च २०२२) रोजी कर्ज स्थिती खालील प्रमाणे आहे.**

| S.No. | Unit Name | Outstanding Amount | Outstanding Account | OD Account | OD Amount | PAR Account | PAR Amount | Recovery % |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Latur | 8756772 | 160 | 0 | 0 | 0 | 0 | 100.00% |
| 2 | Beed | 75231692 | 1816 | 84 | 226636 | 0 | 0 | 99.51% |
| 3 | Osmanabad | 91893406 | 3610 | 43 | 312599 | 16 | 599342 | 99.58% |
| 4 | Bhoom | 46427686 | 1909 | 29 | 136058 | 10 | 187291 | 99.62% |
| 5 | Hingoli | 7300878 | 207 | 1 | 3687 | 0 | 0 | 99.91% |
| | **Total** | **229610434** | **7702** | **157** | **678980** | **26** | **786633** | **99.58%** |

**एन पी ए व्यवस्थापन**

दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी कंपनीचे वसुलीचे प्रमाण ९९.५८ टक्के आहे कंपनीची अनुत्पादक कर्ज रू ७.८७ लाख आहेत व यापुढे अनुत्पादक कर्ज वाढणार नाही याची काळजी सर्व युनिट मॅनेजरनें घेणे गरजेचे आहे.

# कर्मचारी वर्ग

मायक्रो फायनान्ससारख्या सेवा क्षेत्रात बचत गट व संयुक्त जबाबदारी गटापर्यंत पोहचण्याकरीता व गरजुना सेवा देण्याकरीता कर्मचा-यांचे मोठे योगदान आहे याबददल कंपनीस आपल्या कर्मचा-यांवर विश्वास आहे , सर्व युनिट वर आवश्यक त्या गरजेनुसार धोरणात्मक व प्रशासनात्मक या दोन्ही स्तरावर नेतृत्व विकसित करण्याच्या दृष्टीने कंपनीने योग्य असे धोरण तयार केलेले आहे. **कर्मचा-यांना कौशल्य, ज्ञान व क्षमता विकसित करण्याकरता कंपनीने कर्मचा-यांना वेळोवेळी प्रशिक्षण दिलेले आहे. विविध स्तरावरील कुशल कर्मचारी भरती करणेबाबतीतही कंपनीने पावले उचलली आहेत.**

## सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षाअखेर कर्मचारी स्थिती

| युनिट | CEO | Operation Head | A/c Exe | Software Incharge | UM | Risk Manager | FX | CA | Accountant | Office Assistant | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मुख्य कार्यालय | 1 | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 4 |
| लातुर | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 1 | 1 | 4 | 1 | 0 | 8 |
| बीड | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 2 | 2 | 7 | 2 | 1 | 15 |
| हिंगोली | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 1 | 2 | 1 | 0 | 5 |
| उस्मानाबाद जिल्हा कार्यालय | 0 | 1 | 1 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 2 |
| कळंब (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 8 | 1 | 1 | 13 |
| भुम (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 9 | 1 | 0 | 13 |
| वाशी (उस्मानाबाद) | 0 | 0 | 0 | 0 | 1 | 0 | 2 | 8 | 1 | 0 | 12 |
| एकुण | 1 | 1 | 2 | 1 | 6 | 3 | 10 | 38 | 7 | 3 | 72 |

## शाखा विस्तार

**आर्थिक वर्ष २०२१ २०२२** मध्ये नवीन युनिट उघडलेले नाही मात्र **तेलंगणा राज्यात** नवीन शाखा उघडणेबाबत चर्चा चालु आहे.
व तेलंगणा मध्ये लवकरच शाखा उघडण्यात येईल असे व्यवस्थापनाने ठरविले आहे.




## माहिती तंत्रज्ञान

- कंपनीने बेसिक्स च्या सहकार्यातुन डेलफिक्स नॅनो ही संगणकीकृत ऑनलाईन व्यवहाराचे सॉफ्टवेअर विकसित केले असुन आजघडीला कंपनीचे सर्व युनिट हे ऑनलाईन व अपडेट आहेत. कंपनीचे मुख्य सर्व्हर बेसिक कार्यालय हैद्राबाद येथे आहे.

- मात्र हे तंत्रज्ञानसुदधा जूने झाल्याने **जयम या अग्रगण्य सॉफ्टवेअर कंपनीबरोबर** नवीन फायनान्स मॅनेजमेंट सॉफ्टवेअर विकसित करणेबाबत व्यवस्थापनाने निर्णय घेतला आहे.

## जोखीम व्यवस्थापन

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या नियमान्वये कंपनीने जोखीम व्यवस्थापनाकरीता समिती स्थापन केली आहे. कंपनीच्या जोखीम व्यवस्थापन समितीमध्ये संचालक मंडळ हे शिर्षस्थानावर आहे ते संपूर्ण जोखमींची देखरेख करते.

## अंतर्गत नियंत्रण पध्दत

कंपनीचा दरआठवडयाला घेतला जाणारा विकली रिपोर्ट तसेच फिल्ड वरील कर्मचा-यांचे रोजच्या रोज घेतले जाणारे रेकॉर्ड व मासिक रिपोर्ट या सर्वांकरीता कंपीनने विविध प्रकारचे फॉरमॅट बनविले असून या फॉरमॅट च्या सहाय्याने कंपनीने अंतर्गत नियंत्रण पदधतीत सुसूत्रता आणली आहे.कंपनीचे सर्व युनिटचे सहामाही अंतर्गत लेखा परिक्षण नियमित करण्यात आलेले आहे. तसेच कंपनीच्या सर्व शाखांचे वार्षिक परिक्षण हे चार्टड अकाउंट्स फर्मकडून करुन घेतले जाते .

**महत्वपुर्णः संचालक मंडळाने ठरवुन दिलेल्या धोरणांप्रमाणे सर्व शाखांची अंतर्गत तपासणी व ऑडीट हे सन २०२१- २०२२ मध्ये करण्यात आलेले आहे**

**कंपनीचे ध्येय**

खेडयातील गरीब महिलांना योग्य दरात आर्थिक सहाय्य देण्याबरोबरच त्यांचे राहणीमान उंचावणे व त्यांना परवडणा-या दरात आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देणे व सोबतच त्यांचे सक्षमीकरण करणे.

**Aims to empower rural poor women and to improve their standard of living by extending integrated financial services at affordable costs.**

**कंपनीचे व्हिजन**

- **सन २०२५ पर्यत महाराष्ट्रातील ४०००० कुटूंबांना १० शाखांच्या माध्यमातून ५० कोटीपर्यतचे अर्थसहाय्य करणे त्याचबरोबर महाराष्ट्राबाहेर देखील कंपनीचा विस्तार करून कंपनीची प्रतिमा जनमानसात बिंबवणे.**
  **To promote sustainable livelihoods of 40000 families by opening and serving through 10 units by 2025.**

- **सामाजातील दुर्लक्षित घटकांना सुक्ष्म वित्त देणारी व्यावसायीक दृष्टया व्यवस्थापन असलेली सुक्ष्म वित्त संस्था**
  **To extend the micro-financial services including to the so-far excluded community by establishing a professionally managed Community-based micro-finance institution.**

- **ग्रामीण भागातील महिलांचे मानवी हक्क व जमीन हक्काबरोबर त्यांचे सामाजिक व आर्थिक स्तर उंचावणे.**
  **Enhance socio-economic status of rural women while continuing its movement for human and land rights.**

## आर्थिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये घेण्यात आलेल्या बोर्ड मिटींग व त्याकरीता असलेली संचालकांची उपस्थिती

| Sr. | संचालकांचे नांव | संचालक मंडळाच्या बैठका | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 12/04/2021 | 08/05/2021 | 29/08/2021 | 08/12/2021 | 04/02/2022 | एकुण |
| 1 | रमेश विनायक भिसे | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |
| 2 | विश्वनाथअण्णा तोडकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |
| 3 | सुभाष कृष्णाजी तगारे | अनुउपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ४ |
| 4 | जयाजी पुरभाजी पाईकराव | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | ३ |
| 5 | सीमंतिनी शशांक खोत | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | उपस्थिती | १ |
| 6 | हेमंतकुमार वाळवेकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |
| 7 | विक्रमजित मेहमी | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | १ |
| 8 | बेबी जोसेफ अरॅकपारामपिल | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | अनुउपस्थिती | ० |
| 9 | विजय रमेश भिसे | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |
| 10 | सुरज बालासाहेब सूर्यवंशी | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |
| 11 | ऋषीकेश विश्वनाथ तोडकर | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | उपस्थिती | ५ |

## संचालकांच्या समित्या

**कंपनीच्या हिताच्या दृष्टीने संचालक मंडळाने संचालकांच्या ५ समित्या स्थापन केल्या आहेत सदर समित्या त्यांचे अधिकारात येणा-या कार्यक्षेत्रांविषयी धोरण ठरवितात. संचालक मंडळाच्या समित्या व त्यांचे सदस्य खालीलप्रमाणे**

| क्र. | समितीचे नांव | सदस्य |
|---|---|---|
| १ | **रिस्क मॅनेजमेंट समिती** | श्री सुभाष तगारे (संचालक)<br>श्री.बालासाहेब सुर्यवंशी (उपाध्यक्ष मॅनेजमेंट कमिटी)<br>श्री.ऋषीकेश विश्वनाथ तोडकर,(संचालक)<br>श्री विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर - बीड) |
| २ | **मानव संसाधन समिती** | श्री.रमेश भिसे (चेअरमन)<br>श्री. बालासाहेब सुर्यवंशी (उपाध्यक्ष मॅनेजमेंट कमिटी)<br>श्री. यशवंत आहेर (सी ई ओ)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर - बीड) |
| ३ | **परिचालन समिती** | श्री.विश्वनाथ तोडकर (व्यवस्थापकिय संचालक)<br>श्री.यशवंत आहेर (सी.ई.ओ)<br>श्री.विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा)<br>श्री.सुशांत पाईकराव, हिंगोली |
| ४ | **सामजिक वित्तीय व विमा** | श्री. जयाजीराव पाईकराव (संचालक)<br>श्री. सुरज बालासाहेब सुर्यवंशी (संचालक)<br>श्री. विजय भिसे (संचालक)<br>श्री. विलास गोडगे (ऑपरेशन हेड उस्मानाबाद जिल्हा) |
| ५ | **ऑडीट प्रणाली** | श्री विश्वनाथ तोडकर (व्यवस्थापकिय संचालक)<br>श्री .यशवंत आहेर (सी ई ओ)<br>श्री. शरद पवार (युनिट मॅनेजर)<br>श्री. सुशांत पाईकराव, (युनिटमॅनेजर हिंगोली)<br>श्रीमती.तेजश्री भालेराव (अकाउंट एक्झिक्यूटिव्ह,HO) |

**प्रकटन** कंपनीने कंपनीच्या हितसंदर्भाने संस्थापक, संचालक व नातेवाईक आणि व्यवस्थापन यांच्यामध्ये गंभीर हितसंबंध होण्याची संभावना निर्माण होईल असे व्यवहार कंपनीत केलेले नाहीत. कंपनीत होणारे प्रत्येक व्यवहार हे कंपनीने ठरविलेल्या ध्येय धोरणांनुसारच व पारदर्शकपदधतीने होतात यांची संचालक मंडळ हमी देत आहे.

## संचालक मंडळाचे जबाबदारीचे विधान

**दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाच्या वार्षिक हिशोबात खालील प्रमाणे पुर्तता झाल्याचे संचालक मंडळ पुष्टी देते**

- वार्षिक हिशोब पुर्ण करीत असतांना पुरक स्पष्टीकरणांसोबतच सर्व अकाउंटिंग स्टँडर्डचे पालन करण्यात आले आहे
- कंपनीने रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सुचनांन्वये अकावूंटींग पॉलिसीज तयार केल्या असुन त्याच्या अंमलबजावणीमध्ये सातत्य ठेवले आहे.
- दिनांक ३१ मार्च २०२२ रोजी संपलेल्या आर्थिक वर्षाची हिशोब पुस्तके व नफा यात सत्यता व पुरकता येण्याकरता योग्य गृहीतके व अंदाज बांधण्यात आले आहेत.
- कंपनीच्या मालमत्तेच्या सुरक्षेकरीता तसेच गैरव्यवहांरास व इतर नियमबाहय गोष्टी रोखणेकरिता भारतात रुढ असलेल्या तरतुदीन्वये अकाउंटिंग रेकॉर्डसच्या पालनांकरिता योग्य ती खबरदारी घेतली आहे

## कंपनीची तत्व प्रणाली

**कार्यक्षमपणे व्यवहार करणे , भागधारकांचे हित जोपासणे , पारदर्शी व योग्य व्यवस्थापन करण्यास कंपनी वचनबदध आहे सर्व कामकाज पारदर्शीपणे व जबाबदारीने पार पाडीत असलेबाबत संचालक मंडळ खात्री देत आहे.**

## लेखा परिक्षकांचा आर्थिक वर्ष २०२१- २०२२ चा अहवाल

**लेखा परिक्षकांच्या अहवालामध्ये प्रतिकुल ताशेरे व नोंदी नाहीत**

## आर्थिक वर्ष २०२२- २०२३ करिता लेखा परिक्षकांची नेमणूक

**कंपनीचे लेखा परिक्षक 'याडकीकर आणि चांडक' चार्टड अकावुंटंट , औरंगाबाद. हे कंपनीचे मुख्य लेखा परिक्षक असुन त्यांनी अतिशय उत्कृष्ट पध्दतीने सन २०२१-२०२२ चे लेखापरिक्षण त्यांनी अतिशय उत्कृष्ट पध्दतीने केले आहे त्यामुळे ते फेरनमणुकीस पात्र आहेत सबब त्यांची सन २०२२ - २०२३ या आर्थिक वर्षाकरीता लेखा परिक्षक म्हणुन नेमणुक करून त्यांचा मेहनताना ठरविण्यात यावा ही विनंती करण्यात येत आहे-**

## आर्थिक वर्षे २०२१- २०२२ मधील महत्वाच्या बाबी

- **गेल्या आर्थिक वर्षात राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त एवंम विकास निगम (NSFDC) यांनी कंपनीची जास्तीत जास्त कर्ज घेण्याची मर्यादा रू २ कोटींवरून रू ५ कोटी केली आहे. या वाढीव कर्जमर्यादेमुळे कंपनीने टाकलेल्या प्रस्तावास मान्यता देवुन NSFDC यांनी कंपनीला या आर्थिक वर्षात रू २९८.९८ लाखांचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे.**
- **गेल्या आर्थिक वर्षात कंपनीच्या स्वतःच्या भाग भांडवलामध्ये रु ९.५१ लाखाची वाढ झालेली आहे व मार्च २०२२ पर्यंत कंपनीचे स्वतःचे भाग भांडवल रु १२ कोटी ०१ लाखापर्यंत झालेले आहे यामधे कंपनीचे भागधारक , भागीदार इतर सभासद यांचा महत्वाचा सहयोग आहे.**

## आर्थिक वर्षे २०२१- २०२२ मधील महत्वाच्या बाबी

- कंपनीचे भागभांडवल वाढल्यामुळे व राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त एवंम विकास निगम (NSFDC) यांनी दिलेल्या कर्जामुळे कंपनीने गेल्या आर्थिक वर्षांत एकूण कर्जवाटप ५०९४ गटांना रू २०.२८ कोटी केलेले आहे ही उल्लेखनिय बाब आहे.
- कंपनीचे एकुण कर्जवाटपस्थिती १८.६८ कोटींवरून २२.९६ कोंटींपर्यंत झालेली आहे.
- SMERA या रेटींग एजन्सीने आपल्या कंपनीचे नुकतेच ग्रेडींग केले आहे व त्यांनी आपल्या कंपनीला M 4 हे ग्रेडींग दिलेले आहे.
- कंपनीने गेल्या आर्थिक वर्षात NCD (Non-Convertible Debenture) मध्ये एकूण ३.९६ कोटी उभे केले आहे.
- कोवीड १९ मुळे उदभलेल्या कठीण परिस्थतीवर कंपनीने आता संपुर्णपणे मात केलेली आहे.व कंपनीचे कर्ज रिकव्हरी प्रमाण ९९.५८ टक्के आहे ही उल्लेखनिय बाब आहे.

## आभार

कंपनीने अलिकडील काळात व्यावसायिकता व तंत्रज्ञान अंगीकारले असून कंपनीचा व्यवसाय व नफा व क्षमता वाढीस याचा उपयोग होत असून या व्यवसाय वाढीस कंपनीच्या कर्मचारी वर्गाचाही महत्वाचा सहभाग आहे यामुळे कंपनीने सर्व बचत गटांमध्ये व जनमानसात आपला ठसा उमटविला आहे. सतत समर्पित वृत्तीने काम करीत असलेला आपला कर्मचारी वर्ग अभिनंदनास पात्र आहे. कंपनीच्या सर्व प्रयासाय नेहमीच सर्व बचत गटांनी भरघोस प्रतिसाद दिला आहे .

कंपनीच्या प्रगतीमध्ये कंपनीचे भागधारक हे महत्वाचे भागीदार आहेत त्यांचा आम्हांस मिळणारा पाठींबा व कंपनीवर त्यांनी दाखविलेला विश्वास याकरता कंपनी त्यांची आभारी आहे. कंपनीचे भागधारक, बचत गट सदस्य , हितचिंतक , बचत गट सदस्य,यांचेकडुन सततच्या सहकार्य व पाठींब्याबददल संचालक मंडळ आभारी आहे. तसेच रत्नाकर बँक, एस बी आय, बेसिक्स / आय जी एस लॅम्प फंड व NSFDC (National Scheduled Castes Finance and Development Corporation) इतर रेग्युलेटरी ॲथोरीटी, इतर आर्थिक संस्था, बँका यांच्याकडुन मिळालेला अमूल्य सल्ला व आर्थिक सहाय्य या सर्वांबददल संचालक मंडळ त्यांचे आभारी आहे.

**स्थळ – लातूर**

**दिनांक २७ सप्टेंबर २०२२**

**श्री.रमेश भिसे**
चेअरमन

# यशोगाथा



## अनिक फायनान्स मुळे शेतीला जोडधंदा मिळाला.

माझे नाव सुनीता भास्कर ढेंगळे मी उस्मानाबाद जिल्हयातील वाशी तालुक्यातील फक्राबाद या गावची रहिवाशी आहे. माझे शिक्षण इयत्ता-९ वी पर्यंत झाले आहे . मला एक मुलगा व एक मुलगी आहे तसेच सासू -सासरे ,पती आणि मी असे आमचे सुखी कुटूंब आहे . तसे माझे सर्वसाधारण कुटूंब आहे, आमचा मुख्य व्यवसाय शेती आहे . आमच्या घरातील महिलांना पुर्वी घराच्या बाहेर कधीच पडू दिले जात नव्हते ,त्यामुळे मला पण गावातील जास्त माहिती नसायची ,पण हळूहळू बचत गटाची माहिती मिळाली .बचत गटात आले ,त्यामुळे मला अनिक विषयी माहिती मिळाली . अनिक महिलांना आर्थिक मदत करत आहे ही माहिती समजील ही माहिती आमच्या घरी सांगितली, त्यामुळे घरच्यांना देखील पटले, आणि मी पहिल्यांदा तेजस्विनी गटातून २५०००रु कर्ज घेतले. त्यामध्ये माझेकडची काही बचत टाकली व त्यातून एक गाय घेतली.अगोदरची पण एक गाय होती मग माझ्याकडे दोन गायी झाल्या .दुग्ध व्यवसायाची जोड आमच्या संसाराला झाली . पुढे दुग्ध व्यवसाय गायपालन यामध्ये आमच्या घरच्यांना खूप आवड निर्माण झाली .नंतर मी दुसरे कर्ज ६०,०००रु घेतले. आणि खवा भट्टी चालू केली कारण खवा आमच्याच गायींचा जास्त म्हणजे १५ ते २० किलो होऊ लागला होता. त्यामुळे मला हफ्ता परतफेडीला पण कधी अडचण आली नाही . आम्ही लॉकडाऊन मध्ये पण वेळेतच अनिकचे हफ्ते भरले व आजदेखील अनिकचे हफ्ते परतफेड वेळेत करत आहे. माझ्या उत्पन्नात मध्ये देखील वाढ झाली आहे आता आमच्या घरी १० गायी आहेत. त्यांचा खवा आम्ही घरी घोटतो . गायीचा चारा ,खुराख वेळेत त्यांना दिला की,दूधपण जास्त निघते. म्हणुनच आमच्या कुटुंबास अनिकच्या कर्जाची खूप मदत झाली आहे.

**आज आमच्याकडे एकूण १० गायी आहेत. एकूण १० ते २० किलो रोज खवा होत आहे .एकूण ४००० ते ४३०० रु एवढे खव्यामधून उत्पन्न मिळत आहे . त्यामुळे दुग्ध व्यवसाय हा शेतीला जोड-धंदा झाला आहे . म्हणूनच मी म्हणते अनिकने आम्हाला जगायला शिकवले आहे .**



## अनिक फायनान्स मुळे घडून आली आर्थिक प्रगती

नाव -कल्पना भाऊसाहेब लाखे वय : ३२ वर्षे गाव : लाखनगाव ता. वाशी जिल्हा : उस्मानाबाद.

लाखनगाव हे गाव वाशी तालुक्यात असुन लहानशे खेडेगाव आहे. या गावात आठवडी बाजार सुध्दा नाही. आठवडी बाजार करायचा तर पारा या जवळच्या गावी जायचं महिलांनी बाहेर पडायचं तसं मुश्किलच. शेतीतर होतीच पण आपण काहीतरी व्यवसाय केला पाहिजे असं मला सारखं वाटत रहायचं. अशातच अनिक कंपनीच्या पांचाळताई या गावात येतात व २% दराने कर्ज देतात हे समजले. मी त्यांची भेट घेतली आणि परतफेड कशी करायची हे जाणुन घेतले मी त्यांच्याकडे कर्जमागणी केली. ग्रुपमधुन मला रू. ३००००/- कर्ज मिळाले. त्यातुन मी साड्या, ब्लाऊज पीस इत्यादी खरेदी केले आणि माझा छोटासा व्यवसाय सूरू केला. त्यानंतर व्यवसायवाढीसाठी मी जास्तीच्या कर्जाची मागणी केली त्यासाठी आमच्या ग्रुपला शेंडगेसरांनी योग्य ते मार्गदर्शन केले. एफ.एक्स उषा मस्तुद यांनी अप्रायजल मिटिंगमध्ये आम्हाला कंपनीचे नियम सांगुन कर्ज परतफेड वेळेवर करण्यास सांगितले. मला ६००००/- रू. कर्ज मिळाले त्यातुन मी भांडी खरेदी केली आणि माझे भान्डीभांडार सुरु झाले. माझा भांड्यांचा व्यवसाय चांगला चालला आहे. माझ्या व्यवसायातून कर्जाचा हप्ता पण जात आहे. मी आणि माझे कुटूंब मजेत आहे. या महिन्यात भांडी खरेदीसाठी चारचाकी गाडीपण खरेदी केली आहे.



## अनिक फायनान्स मूळे मी माझ्या पायावर खंबीरपणे उभी आहे.

नाव क्रांती अमोल तांबडे , वय ३० वर्षे गाव- डोंगरेवाडी ता. वाशी जिल्हा - उस्मानाबाद

डोंगरेवाडी हे गाव लहानशे खेडेगाव आहे. गावात तशा सोयी कमीच. शाळा चौथीपर्यंतच. गावात पूर्णतः शेतकरीच. मुख्य उत्पन्न हे शेतीतूनच, नोकरदार वर्ग नाहीच. अत्यंत मागासलेलं गाव. शेती पूरक व्यवसाय करायचा तर गायी , शेळया , म्हशी , कोंबड्या पाळणे हाच. मी शेळया पाळायच्या ठरवल्या. माझ्याकडे शेळया खरेदीसाठी पुरेसे पैसे नव्हते. त्यामुळे मी अनिकच्या क्लस्टर असिस्टंट रोहिणी कोठावळे यांच्याकडे कर्जमागणी केली. रू. ३०००० कर्ज मिळाले . त्यातुन मी ४ शेळया खरेदी केल्या. शेळयांच्या उत्पन्नातून मी घेतलेल्या कर्जाची परतफेड केली. त्यानंतर मी रोहिणी कोठावळे यांच्याकडे कर्जमागणी केली. कोठावळे मॅडम आणि शेंडगे सर यांनी आमच्या ग्रुपला योग्य असे मार्गदर्शन केले. कर्ज वाटपाच्यावेळी श्री.विलास गोडगे साहेबांनी आम्हाला मार्गदर्शन केले. त्यांचे मार्गदर्शन ऐकून मी जे रु. ६०००० कर्ज घेतले त्यातुन २ गायी खरेदी केल्या. माझ्याकडे काही रक्कम शिल्लक होती त्यातून पुन्हा शेळया खरेदी केल्या. आता माझ्याकडे ४ शेळया आहेत आणि २ गायी आहेत. मी या गायींचे दूध डेअरी वर घालते. डेअरीवर १० दिवसाला पगार होते. त्यातून मी हप्ता परतफेड करते. मला अनिक कंपनीमुळे जगण्याची नवी उमेद मिळाली आहे मी माझ्या पायावर खंबीरपणे उभी आहे.

## अनिक फायनान्सच्या सहकार्याने केली आर्थिक प्रगती...



**मी चित्रा नवनाथ माने राहणार पाथरुड ता. भूम जि.उस्मानाबाद** ची रहिवाशी असून २००४ सालापासून अनिक फायनासिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कडून अर्थसहाय्य घेतले होते. त्या रक्कमेतून मी म्हैस खरेदी केली व दुग्ध आणि पेढा व्यवसाय चालू केला त्यातून मी कर्ज परतफेड व्यवस्थितरीत्या परत केली नंतर मी व आमच्या गटाने दुसरे कर्ज घेऊन पेढा व्यवसायामध्ये वाढ केली. पहिल्यांदा गावामध्ये पेढा व्यवसाय चालू केला व गावामध्येच विकू लागलो. पुढील कर्ज घेऊन आम्ही हळू हळू शिर्डी, त्र्यंबकेश्वर, नाशिक शनिशिंगणापूर या देवस्थानी पेढा विक्री करू लागलोत.

पेढा व्यवसायातून गावातील मजुरांसाठी रोजगार मिळवून देण्यास संधी मिळाली प्रत्येकाला रोजगार मिळत राहिल्यामुळे गावातील व्यवहार हळू हळू वाढत गेला. अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडच्या कर्जाचा खूप चांगल्या प्रकारे आम्हाला उपयोग झाला आज माझ्या घराची प्रगती केवळ अनिक कंपनी मुळेच झाली आहे. मी अनिक कंपनीची अत्यंत आभारी आहे.

## मालनबाई कांबळे यांनी शेळयांच्या उत्पादनातून आपल्या बेरोजगार मुलाला ट्रॅक्टर खरेदी करून दिला...



उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मौजे खेरडा हे गाव दुष्काळी पट्ट्यात येणारे गाव आहे. मालनबाई गणपती कांबळे यांना एक मुलगा एक मुलगी व पती असा यांचा छोटासा परिवार. घरी कोरडवाहू चार एकर शेती वर्षाकाठी शेती मधून उत्पन्न येत नव्हते, बराचसा कालावधी ऊसतोड मजुरी मध्ये जायचा. यामधून मुलीचे लग्न केले कुटुंबामध्ये खूप अडचणीचे दिवस सूरू झाले होते. दलीत वस्ती मध्ये सीए मिरा पवार यांच्या मार्गदर्शनाने नवीन तयार झालेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे महिला बचत गटामध्ये सहभागी झाल्या. अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनी कडे गट जोडला. त्यांना सुरुवातीला वीस हजार रुपये कर्ज मिळाले ते त्यांनी शेतीसाठी खर्च केले. दोन वर्षांमध्ये त्यांनी व्यवस्थित परतफेड केली. त्या अनुसूचित जाती पैकी मांग या जातीच्या असल्यामुळे त्यांना एन.एस.एफ.डी.सी च्या मार्फत अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड यांच्या कडून त्यांच्या गटाला कर्ज मंजूर झाले. त्यापैकी त्यांना ३६००० रुपये कर्ज मिळाले . या कर्जातून त्यांनी तीन शेळया घेतल्या. या शेळया आपले पती गणपत कांबळे यांच्या मदतीने शेती करत करत शेळया राखत राखत आपल्या कुटुंबाचे उत्पन्न वाढविले. तयार झालेल्या शेळया विक्रीतून त्यांनी बचत केली.

तीन वर्षाच्या कालावधीमध्ये त्यांनी त्यांच्याकडील कर्ज परतफेड केली. अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकडून पुन्हा त्यांनी शेतीसाठी एन.एस.एफ.डी.सी कडून पन्नास हजार रुपयाची कर्ज घेतले. शेतामध्ये बोअरवेल घेतला. त्याला चांगले पाणी लागले. शेळयांच्या व शेतीच्या उत्पन्नातून मालनबाई कांबळे यांनी आपला बेरोजगार मुलगा विठ्ठल यास ट्रॅक्टर खरेदी करून दिला. मालन कांबळे व गणपती कांबळे या पती-पत्नीने पर्याय संस्थेचे मा विश्वनाथ तोडकर (अण्णा), अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेडचे ऑपरेशन हेड विलास (बापू) गोडगे, ब्रांच मॅनेजर भिकाजी जाधव, कळंब तालुक्याचे फिल्ड एक्झिक्यूटिव्ह अश्रुबा गायकवाड, क्लस्टर असिस्टंट मीराताई पवार व त्यांच्या पूर्ण स्टाफचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. मी माझ्या बेरोजगार मुलाला ट्रॅक्टर घेऊन देऊ शकले, मला कुटुंबामध्ये मान मिळाला, गावामध्ये माझ्या कुटुंबाचा सन्मान वाढला म्हणून **मी सर्व अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड व पर्याय संस्थेच्या परिवारतील सर्वांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करते.**

माहिती संकलन - **आश्रुबा गायकवाड,** फिल्ड एक्झिक्यूटिव्ह ,कळंब युनिट

# अनिकच्या कर्जातून मिळाला जगण्याचा मार्ग



कुसुम पांडुरंग जाधवर मौजे रत्नापूर उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील धूळे-सोलापूर हायवे वर रत्नापूर हे दोन हजार लोकसंख्या असलेले गाव आहे. या गावात राहणाऱ्या कुसुम पांडुरंग जाधवर वय ३२ वर्ष त्यांनी २०२० या वर्षात तीस हजार रुपये कर्ज घेऊन त्याची एकही हफ्ता न चुकता व्यवस्थित परतफेड केली आणि यावर्षी परत दुसरे कर्ज साठ हजार रुपये त्यांनी घेतले आहे पहिल्या कर्जाच्या रकमेत स्वतः जवळचे दुसरे सदतीस हजार रुपये टाकून त्यांनी ६७ हजार रुपये ची गाय खरेदी केली त्यांना त्या मधून चांगला फायदा झाल्यामुळे त्यांनी आता यावर्षी २०२२ मध्ये घेतलेल्या साठ हजार रुपये ची आणखी एक गाय खरेदी केली आहे, त्यांनी त्यांच्या घरासमोरच आपली स्वतःची खवा भट्टी सूरू केली आहे, खवा भट्टीचे काम बघून शेत सांभाळतात त्यांना दोन एकर शेती आहे, गाईची देखरेख त्या स्वतः करतात, त्यांच्या पतीची एक स्कूल बस आहे ते त्याचे काम पाहून कुसुम ताई यांना कामात मदत करत असतात.

लोन फॉलो घेण्यासाठी अनिक कळंब युनिट चे  शाखा व्यवस्थापक म्हणून मी स्वतः भिकाजी जाधव, क्षेत्रीय अधिकारी वैभव चोंदे आणि क्लस्टर सहायक सविता बांगर आम्ही भेट दिली असता त्यांच्याशी संवाद साधला यावेळी त्या म्हणाल्या कि 'अनिक फायनान्सीयल सर्व्हिसेस प्रा.ली. कंपनीच्या कर्जाचा मी योग्य वापर केल्याने मला याचा खूप फायदा झालेला आहे दर महिन्याला मला गाईच्या दुधाचे २१००० रुपये येतात आणि सर्व खर्च वजा जाता मला अकरा हजार रुपये महिन्याला मागे राहतात, त्यामुळे मी खूप समाधानी आहे, अनिक कंपनीचे सर्व संचालक मंडळ आणि स्टाफ याची मी खूप आभारी आहे.

**माहिती संकलन** - भिकाजी मा. जाधव शाखा व्यवस्थापक, कळंब.

# कुक्कुटपालनातून साधली आर्थिक प्रगती



उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब तालुक्यातील मौजे वाकडी हे गाव दुष्काळी पट्ट्यात येणारे गाव आहे. मनीषा लक्ष्मण करून यांना एक मुलगा एक मुलगी व पती असा परिवार आहे. शेतीला जोडधंदा म्हणून त्यांनी कुक्कुटपालनासाठी अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड शाखा कळंब यांच्याकडून साठ हजार रुपये कर्ज आणि त्यांच्याकडील काही पैसे मिळवून कुक्कुटपालनाचा व्यवसाय त्यांनी सूरू केला.

कुक्कुटपालन व्यवसायातून त्यांना चांगल्या प्रकारे उत्पादन मिळाले आणि ते समाधानी आहेत असे त्या म्हणाल्या त्यांनी पर्याय संस्थेचे, अनिक फायनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड कंपनीकचे व्यवस्थापकिय संचालक मा. विश्वनाथांना(आण्णा) तोडकर, अनीक फायनान्शिअल सर्व्हिसेसचे ऑपरेशन हेड विलास (बापू) गोडगे, ब्रांच मॅनेजर भिकाजी जाधव, कळंब तालुक्याचे फिल्ड एक्झिक्यूटिव्ह वैभव चोंदे, क्लस्टर असिस्टंट वंदना चिलवंत यांचे आभार व्यक्त केले पुढे त्या म्हणतात की पूर्ण स्टाफचे मला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले. त्यामुळे माझ्या यशामध्ये वाढ झाली. मला कुटुंबामध्ये मान मिळाला गावामध्ये माझ्या कुटुंबाचा सन्मान वाढला म्हणून मी सर्व अनिक व पर्यायच्या सर्वांचे मनापासून धन्यवाद व्यक्त करते.

**माहिती संकलन** - फिल्ड एक्झिक्यूटिव्ह वैभव चोंदे, कळंब युनिट

# शेळीपालन व्यवसायातून साधली आर्थिक प्रगती



**महिलेचे नांव :- कमल आसाराम खंडागळे, रा. किट्टी आडगांव, ता. माजलगांव, जि. बीड.**
**गटाचे नांव :- मिराबाई आंबेडकर महिला बचत गट, किट्टी आडगांव, ता. माजलगांव, जि. बीड.**

**महिलेच्या कुटुंबाविषयी :-** कमल आसाराम खंडागळे ह्या सर्वसाधारण कुटुंबातील माजलगांव तालुक्यातील किट्टीआडगांव येथिल मूळ रहिवाशी. त्यांच्या कुटुंबात त्या स्वतः, पती, १ मुलगा, १ सुन व त्यांची ३ मुले असा एकूण ०७ सदस्यांचा परिवार आहे. त्यांना २ एक्कर स्वतः च्या मालकीची शेती असून, त्या शेतीवरती व मजुरी करून, त्या स्वतः चे कुटुंब चालवतात. त्यांचे पती हे दुसऱ्याच्या शेळया राखोळी घेवून, सांभाळत होते.

**गटातील प्रवेश :-** कमल आसाराम खंडागळे या मागील १४ वर्षापासून मिराबाई आंबेडकर महिला बचत गट, कि ट्टी आडगांव, या गटात कार्यरत असून, त्या दरमहा १०० रूपये प्रमाणे गटात बचत करत असून, त्यांची ८८००/-बचत गटात जमा आहे. त्यांनी अनिक कडून ४ वेळा जवळपास रूपये २,००, ०००/- कर्ज घेतलेले आहे.सदरील कर्जाचा वापर त्यांनी कुटूंबाच्या आर्थिक वाढीसाठी केलेला आहे. अशातच गटाच्या माध्यमातून शेळीपालन व्यवसायासाठी द.सा.द.शे. १२% दराने कर्ज मिळल्याने त्यांनी गटातून सदरील कर्ज उचलन्याचे ठरवले व रूपये ४८,०००/- कर्ज घेवून, शेळीपालन व्यवसाय सूरू केला.

**शेळीपालन व्यवसायात केलेली वाढ :-** कमल आसाराम खंडागळेयांनी मिराबाई आंबेडकर महिला बचत गट, किठट्टी आडगाव, ता. माजलगांव या गटास शेळीपालन व्यवसायासाठी अनिक फायनांसिअल सर्व्हिसेस प्रा. लि. कडून, रूपये १,९२,०००/- कर्ज मिळाले. सदरील कर्ज हे ४ सदस्यांनी समान रूपये ४८,०००/- घेतले. या कर्जात कमल आसाराम खंडागळे यांनीही स्वतः चे नावाने रूपये ४८,०००/- कर्ज घेवून, ५ शेळया खरेदी केल्या व स्वतः चा शेळीपालन व्यवसाय सूरू केला. तसेच दुसऱ्याच्या राकोळीने शेळया सांभाळणे बंद केले.

**सध्यस्थिती :-** सदरील कर्ज घेवून, स्वतः चा शेळीपालन व्यवसाय सूरू केल्यानंतर आज त्यांच्याकडे मोठ्या १४ शेळया, २ मोठे बकरे, छोटे ६ पिल्लं असे एकून २२ नग आहेत. आजपर्यंत त्यांनी १२ पिल्लांची विक्री केली असून, त्यातून त्यांना १७,०००/- रूपये मिळाले आहेत. सध्याच्या त्यांच्याकडील शेळयांच्या मार्कटमधील किंमतीचा विचार केला असता, जवळपास १,५०,००० ते १,७५,००० रूपये किंमतीच्या शेळया आहेत.

त्यांनी घेतलेल्या कर्जाची परतफेड देखील त्या वेळेत व व्यवस्थित करत आहेत. त्यांचे पती आज पूर्णवेळ शेळया सांभाळण्याचे काम करत असून, त्या स्वतः रोजंदारीचे काम करत आहेत. त्यांच्या म्हणण्या नूसार त्यांच्या कुटूंबाची अनिक फायनान्समुळे खुप सुधारणा झालेली आहे.

**माहिती संकलन,**
**शरद पवार,** युनिट मॅनेजर, अनिक फायनान्सिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड युनिट केज (बीड)

# शेळीपालन व्यवसायातून साधली आर्थिक प्रगती



**महिलेच्या कुटुंबाविषयी :-** कांताबाई शंकर घोडके ह्या सर्वसाधारण कुटुंबातील केज तालुक्यातील विडा येथिल मुळ रहिवाशी. त्यांच्या कुटुंबात त्या स्वतः विधवा असून, १ मुलगी, ३ मुले, ३ सुना व त्यांची ८ मुले असा एकूण १६ सदरयांचा परिवार आहे. त्या व त्यांची मुले मजुरी व छोटे - मोठे व्यवसाय करून, त्या स्वतः चे कुटूंब चालवतात. शेळया सांभाळण्याचे काम कधी त्या स्वतः तर कधी मुले सांभाळतात.

**गटातील प्रवेश :-** कांताबाई शंकर घोडके या मागील १४ वर्षापासून वसुंधरा महिला बचत गट, विडा या गटात कार्यरत असून, त्या दरमहा १०० रूपये प्रमाणे गटात बचत करत असून, त्यांची १६००/- बचत गटात जमा आहे. यापुर्वीची जमा झालेली बचत मागील वर्षी सर्व सदरयांनी आपसात वाटून घेतलेली आहे. त्यांनी अनिक कडून ४ वेळा जवळपास कर्ज घेवून, त्याची परतफेडही विना तक्रार केलेली आहे. गटांतर्गत घेतलेल्या अनिकच्या कर्जाचा वापर त्यांनी त्यांच्या कुटूंबाच्या आर्थिक वाढीसाठी केलेला आहे. अशातच गटाच्या माध्यमातून शेळीपालन व्यवसायासाठी द.सा.द.शे. १२% दराने कर्ज मिळल्याने त्यांनी गटातून सदरील कर्ज उचलन्याचे ठरवले व रूपये ४८,०००/- कर्ज घेवून, शेळीपालन व्यवसाय सूरू केला. शेळीपालन व्यवसायासाठी कर्ज घेण्याअगोदर त्यांच्याकडे २ शेळया व १ बोकड होते.

**शेळीपालन व्यवसायात केलेली वाढ :-** कांताबाई शंकर घोडके यांनी वसुंधरा महिला बचत गट, विडा, ता. केज या गटास शेळीपालन व्यवसायासाठी अनिक फायनांसिअल सर्व्हिसेस प्रा. लि. कडून, रूपये ९६,०००/- कर्ज मिळाले. सदरील कर्ज हे २ सदस्यांनी समान रूपये ४८,०००/- प्रमाणे घेतले. या कर्जात कांताबाई शंकर घोडके यांनीही स्वतः चे नावाने रूपये ४८,०००/- कर्ज घेवून, ५ शेळया खरेदी केल्या व स्वतः चा शेळीपालन व्यवसाय सूरू केला व त्यांनी मजुरीने न जाता शेळया सांभाळण्याचे काम सूरू केले.

